**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक**
**पुणे महानगरपालिका**

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक – ११/५/२०२२

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.२**
**मे २०२२**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा **गुरूवार,दि. १९/५/२०२२** रोजी **सकाळी ११.०० (अकरा)** वाजता **महापालिका आयुक्त कार्यालयात** भरेल.

**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.**

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र.२१**

**संदर्भ–** १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.बाळा ओसवाल यांचे दि.२१/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७८३,दि.२१/१२/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम –२०१४ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीची अर्हता व नेमणुकांच्या पध्दती | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|---|---|
| १३९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी –२ | उप अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन –२५% | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक | पदोन्नती –१००% स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्याआस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावर कार्यरत असणे आवश्यक |
| | | | पदोन्नती –७५% | स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्या आस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | |

( टीप :– पुणे महानगरपालिकेकडील शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील सेवकांची पदोन्नतीची कुंठीता घालविण्यासाठी वरीलप्रमाणे पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम २०१४ मध्ये बदल करणे आवश्यक आहे.)

( टीप – सदर विषयाचा विचार माहे मे २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.८१५, दि.१७/२/२०२२ चा झाला आहे. )

**विषय क्र.२२**

संदर्भ :- १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.महेश वाबळे यांचे दि.११/१/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९८३,दि.११/१/२०२२

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

सॅन ॲड्स औंध पुणे ह्या जाहिरातक्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीला ६० फुट X ३० फुट महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मुख्य रस्त्यालगत ५० ठिकाणी अद्यायावत शौचालय महानगरपालिकेसाठी मोफत बांधण्यासाठी, त्यावरील जाहिरात हक्क व जागेसाठी २० वर्षाकरिता करार करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे .

( टीप - सदर विषयाचा विचार माहे मे २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.८०४, दि.१७/२/२०२२ चा झाला आहे. )

**विषय क्र.२३**

संदर्भ :- १) मा. महेश वाबळे, मा. सौ. अर्चना पाटील, मा.सौ. उज्ज्वला जंगले, मा. प्रदीप गायकवाड, मा. राजाभाऊ लायगुडे, मा.विशाल तांबे, मा.राहुल भंडारे , मा. सौ. अश्विनी कदम, मा. श्रीमती. लता राजगुरू, मा.सौ. मानसी देशपांडे , मा. सौ. सुनिता गलांडे यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३५, दि.११/३/२०२२

----

मा. स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन -

PMPML च्या सेवकांचे (चार कोटी )आरोग्य बिलासाठी ४ कोटी देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप - सदर विषयाचा विचार माहे मे २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.५, दि.११/४/२०२२ चा झाला आहे. )

**विषय क्र.२४**

संदर्भ :- १) मा. सौ. वर्षा तापकीर, मा. विशाल तांबे, मा.सौ. मानसी देशपांडे व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३६, दि.११/३/२०२२

----

मा. स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन -

पी.एम.पी.एम.एल च्या सेवकांसाठी ७ व्या वेतन आयोगापोटी र.रू. ६ कोटी ( सहा कोटी )देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप - सदर विषयाचा विचार माहे मे २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.६, दि.११/४/२०२२ चा झाला आहे. )

**विषय क्र.२५**

संदर्भ :- १) मा. सौ. उज्ज्वला जंगले व मा. सौ. मनिषा कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३७, दि.११/३/२०२२

----

मा. स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन -

हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खैबर व बोलन खिंडीतून सुमारे २००० वर्षे अनेक परकीय आक्रमकांनी आपल्या देशावर वारंवार आक्रमणे करून आपल्या देशाचे लचके तोडले होते. अशा आक्रांतांपैकी एक अफगाणिस्थानाचा बादशाह अहमदशाह अब्दाली सन १७६० साली पाचव्यांदा आक्रमण करून आला. तेव्हा अशा पाशवी आक्रमणाचा बिमोड करून देशाचे संरक्षण करण्याच्या हेतूने पुण्यातील शनिवार वाडा येथून सदाशिवराव भाऊंच्या नेतृत्वात मराठा सैन्याने उत्तरेकडे कूच केले. दिनांक १४ जानेवारी १७६१ रोजी हरियाणा मधील पानिपतावर दोन्ही सैन्यांमध्ये तुंबळ युद्ध झाले. या पानिपताच्या तिसऱ्या युद्धात मराठा सैन्यांनी आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली व धगधगत्या राष्ट्रयज्ञकुंडात आपल्या देशासाठी आपल्या प्राणांच्या सुमारे सव्वा लाख आहुत्या दिल्या. मराठा सैन्यांनी आपल्या शौर्याने परकीय आक्रमकांना जोरदार तडाखा देऊन हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खिंडीतून येणारी सततची आक्रमणे थांबविली. खैबर व बोलन खिंडी

आपल्या रक्तामांसाच्या चिखलाने लिंपून कायमच्या बंद केल्या आणि हिंदुस्थानावर चालून येणारा आक्रमक शत्रूंच्या वाटा रोखल्या. मराठे उत्तरेत गेले ते मातृभूमीच्या सीमा निश्चित करण्यासाठी, प्राणपणाने लढले ते हिंदुस्थानाच्या भौगोलिक सीमा राखण्यासाठी आणि लढता लढता हौतात्म्य पावले ते श्रीशिवछत्रपतींनी दाखविलेल्या स्वप्नपूर्तीसाठी आणि स्वाभिमान रक्षणासाठी.

पानिपतावरील पराक्रमी योद्ध्यांना व हौतात्म्यांना मानवंदना म्हणून महाराष्ट्रातील तरूण हरियाणा मधील ''कालाआम पानिपत रणभूमी स्मारक'' येथून शौर्य ज्योत प्रज्वलित करून पानिपत ते पुणे मार्गे दिल्ली, आगरा, ग्वाल्हेर, उज्जैन, इंदूर, धार या मार्गे अखंडितपणे पायी धावत घेऊन येणार आहेत. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाला साजेसे असे शूर हुतात्म्यांचे चिरस्थायी स्मारक पुण्यामध्ये व्हावे या उद्देशाने हि शौर्य ज्योत हौतात्म्य भूमी पानिपता वरून तत्कालीन राजकीय राजधानी पुणे येथे आणली जाईल. दिल्लीतील अमर जवान ज्योती धर्तीवर चिरंतन (३६५ दिवस २४ तास) शौर्य ज्योतीच्या रूपाने 'हौतात्म्य स्मारक' शनिवार वाड्यासमोरील थोरले बाजीराव पेशवे यांची अश्वारूढ मूर्ती आणि राष्ट्रध्वज तिरंगा याच्या मधील मोकळ्या जागेमध्ये स्थापन करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप – सदर विषयाचा विचार माहे मे २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.७, दि.११/४/२०२२ चा झाला आहे. )

**<u>विषय क्र.२६</u>**

संदर्भ :- १) मा.सौ.लता धायरकर यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३८, दि.११/३/२०२२

----

मा. स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

प्रभाग क्र. २१ ब, मधील स.नं. ७७, पिंगळे वस्ती, मुंढवा येथील जागेवर (अंदाजे ०.४४९ हेक्टर) चिल्ड्रन प्ले ग्राऊंडचे आरक्षण आहे. सदर चिल्ड्रन प्ले ग्राऊंड त्वरीत विकसित करून लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी बसविण्यात यावीत व तदनुषंगिक कामे करण्यात यावीत. सदर कामांसाठी लागणारी तरतूद ही सन २०२१-२०२२ च्या अखर्चित रकमेतून (र.रू. ४० लाख) करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

( टीप – सदर विषयाचा विचार माहे मे २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.८, दि.११/४/२०२२ चा झाला आहे. )

**<u>विषय क्र.२७</u>**

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. एनयुआर/२०१३/प्र.क्र.३३८/निवि-३३ दि. १८/०२/२०१४
२) PMPML जा.क्र. PMPML मुलेविअ/४१५२ दि. १३/०१/२०२२.
३) मा. स्थायी समिती ठराव क्र. १३७४, दि. ०३/११/२०२१.
४) मा. मुख्य सभा ठराव क्र. ९६२, दि.१८/०२/२०२२.
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/६८, दि. १८/४/२०२२ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.९७, दि.२२/४/२०२२

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सन २०२१-२०२२ या वर्षातील संचलन तुटीपोटी मागणी करण्यात आलेली पुणे महानगरपालिकेच्या हिश्श्याची (६०%) रक्कम सन २०२२-२०२३ या वर्षात मासिक समान हप्त्यात अग्रीम स्वरूपात अदा करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी अशी, मा. मुख्य सभेकडे शिफारस करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे.

१. PMPMLच्या मागणीनुसार (संदर्भ क्र.२) सन २०२१-२०२२ या वर्षातील अंदाजे संचलन तुटीपोटी पुणे महानगरपालिकेच्या (६०%) स्वामित्व हिश्श्यानुसार र.रू. ३६६.५७ कोटी होत असून संदर्भ क्र. ३ व ४ ने सन २०२१-२२ मध्ये उचल स्वरूपात अदा केलेले रक्कम रूपये १२१ कोटी समायोजित करून उर्वरित र. रू. २४५.५७ कोटी पुणे महानगरपालिकेच्या सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतूदीमधून (RE58A101A) प्रतिमहा र.रू. २० कोटी ११ मासिक समान हप्त्यात (एप्रिल २०२२ ते फेब्रुवारी २०२३) पुणे महानगरपालिकेकडून PMPMLसंस्थेस आदा करणेस,

२. पुणे महानगरपालिकेच्या मा. मुख्य लेखापरीक्षक यांचेकडून पीएमपीएमएलच्या सन २०२१-२०२२ च्या ताळेबंदाचे लेखापरिक्षण झालेनंतर, ताळेबंदानुसार निश्चित झालेली कमी/ अधिक रक्कम १२ वा हप्ता म्हणून PMPMLसंस्थेस अदा करणेस,

**विषय क्र.२८**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/एचओ/७०, दि. १८/४/२०२२ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.९८, दि.२२/४/२०२२

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

Dedicated Covid Hospital बाणेर CellBeans Healthcare Informatics Ltd पुणे यांचेमार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३)(क) अंतर्गत खालील बाबी मा. मुख्य सभेचे अवलोकनार्थ सादर करणेसाठी मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे.

1)CellBeans Healthcare Informatics Pvt. Ltd यांच्याकडून डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल, बाणेर येथील रूग्णांची सर्व माहिती पुरविण्यासाठी दि. 13/9/2021 ते 12/3/2022 पर्यंत कामकाज करून घेणेस.

2)CellBeans Healthcare Informatics Pvt. Ltd यांना HIMS & PACS System साठी one times setup संगणक प्रणालीची डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल, बाणेर करिता रक्कम रू.२.०० लाख + Taxes.

3) एका शिप्टमध्ये एकूण 3 असे 3 शिप्टमध्ये ९ कुशल ऑपरेटरसाठी डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल, बाणेर करिता रक्कम रू. ९.०० लाख + Taxes.

४)CellBeans Healthcare Informatics Pvt. Ltd यांना बिल अदा करणेस खालील बजेट हेडवर खर्च करणेस RE17F258 सन (2021-2022) आरोग्य विभागाकडील कोव्हिड 19 अंतर्गत विविध दवाखाने व रूग्णालयांसाठी वैद्यकीय उपचाराची साधन खरेदी करणे या अर्थशिर्षकातून खर्च करणेस.

**विषय क्र.२९**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्र.अ.शि.वि/७९,दि.२६.०४.२०२२ चे पत्र.

२) मा.शिक्षण समिती ठराव क्र.१, दि. ५/५/२०२२

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१३६, दि.५/५/२०२२

----

प्रभाग क्र.३१, कर्वेनगर सर्व्हे नंबर ९ मधील पुणे मनपाच्या '' भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम नवीन ई-लर्निंग स्कूल'' इंग्रजी माध्यम सुरू करणेबाबत व कायमस्वरूपी पुणे मनपा बजेट मध्ये तरतूद उपलब्ध करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१)प्रभाग क्र.३१ कर्वेनगर सर्व्हे नंबर ९ येथे पुणे मनपाच्या ''भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम ई लर्निंग स्कूल इंग्रजी स्कूल '' इंग्रजी माध्यमाची शाळा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू करणेस.

२)सदर शाळेस होणाऱ्या खर्चास.

३)सदर शाळेसाठी लागणारा अपेक्षित खर्च शिक्षण विभाग प्राथमिक अंदाजपत्रक सन २०२२-२०२३ पुणे मनपामध्ये नवीन ''अर्थशीर्षक '' भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम ई-लर्निंग स्कूल इंग्रजी माध्यम शाळा निर्माण करणेस.

४)सदर शाळेत नवीन शिक्षकांची नेमणूक करणेस.

## मा.विधी समितीचा ठराव

**विषय क्र.३०**

संदर्भ :- १)महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र.पीएमसी.३०१४/प्र.क्र.०२/नवि-२२, दि.२६ऑगस्ट २०१४.

२)मा.सौ.मनिषा लडकत व मा.सौ.सुलोचना कोंढरे यांचे दि.२०/१२/२०२१ चे पत्र.

३)विधी समिती ठराव क्र.४८,दि.२३/१२/२०२१.

४)मा.उपआयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन),माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील अभिप्राय पत्र जा.क्र. १०३९ , दि.२४/०१/२०२२.

५)मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/३५,दि.०६/०४/२०२२ ने पाठविलेला अभिप्राय

६) मा.विधी समिती ठराव क्र.१, दि.२२/४/२०२२

----

पुणे महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील दूरध्वनी परिचर (लपापु), तांत्रिक सेवा, वर्ग-४ या पदाच्या पुणे महानगरपालिका सेवा (सेवा व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेच्या सुधारित प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५७(३)(अ) नुसार मे.शासनाची मान्यता मिळणेसाठी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ. क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.प्रतिनियुक्ती ३.पदोन्नती | प्रचलित नेमणूकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|---|---|
| ३३२ | तांत्रिक सेवा श्रेणी-४ | दूरध्वनी परिचर (लपापु) | नामनिर्देशन | १)माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण किंवा समकक्षअर्हता.<br>२)शासन मान्य संस्थेचा किंवा आय.टी.आय. व एन.सी.टी.व्ही.टी.टेलीफोन ऑपरेटर. | नामनिर्देशन:-<br>५०%<br>१)माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता.<br>२)शासन मान्य संस्थेचा किंवा आय.टी.आय.व एन.सी.टी.व्ही.टी. टेलीफोन ऑपरेटर. |
| | | | | | पदोन्नती:-<br>५०%<br>नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हताधारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवा ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे वर्ग-४ मधील पाच वर्ष शेड्युल मान्य पदावर कार्यरत असणाऱ्या सेवकांमधून पदोन्नतीने. |

## मा.शहर सुधारणा समिताचे ठराव

**विषय क्र.३१**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/४०, दि. ०७/०४/२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१, दि.२२/४/२०२२

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टीडीआर देय क्षे. चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे,हडपसर स.नं.२९/१/६ (पैकी) सि.स.नं. २९५२ (पैकी) | प्रायमरी स्कुल (पीएस-७४ आणि प्ले ग्राऊंड) | १)नानासो अनंता झांबरे<br>२)सोपान अनंता झांबरे<br>३)शंकरराव अनंता झांबरे<br>४)संदिप तुकाराम झांबरे | विरळ वस्ती | ४००.०० चौ.मी | १)प्रायमरी स्कुल (पीएस-७४) ३००.०० चौ.मी.<br>२)प्ले ग्राऊंड १००.०० चौ.मी.असे एकूण ४००.०० चौ.मी.<br>४००.०० चौ.मी. X २.१५= ८६०. ०० चौ.मी. | ००५७६७ | मार्च २०२२ |

**विषय क्र.३२**

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/४१, दि. ०७/०४/२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२, दि.२२/४/२०२२

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन-

मुळा मुठा संगम ते मुंढवा दरम्यान नदी पुर्नजीवन प्रकल्पा अंतर्गत एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील विनियम क्र.३.११ अन्वये नदीकाठच्या ३० मी डी.पी. रस्त्याच्या आखणीमध्ये संगमवाडी टीपीस्कीम फा.प्लॉट नं.९८ नायडू मैलापाणी शुद्धीकरण केंद्र मिळकतीमधील रस्ता स्थलांतरीत करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.३३**

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/४१, दि. ०७/०४/२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०, दि.२२/४/२०२२

----

मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था-४/५५,दि.११.०४.२०२२ चे पत्र.

मा.पदोन्नती समितीने खालीलप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार निवड यादीवरील अधिकारी, श्री.गिलबिले सुनिल तानाजी, हुद्दा-उपमुख्य अग्निशमन अधिकारी यांची मुख्य अग्निशमन अधिकारी, श्रेणी-१ (वेतन मेट्रिक्स - एस

२३:६७७००-२०८७००) या रिक्त पदावर तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा गट | नियुक्तीचा गट | सध्याचे पद | पदोन्नतीचे पद |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.गिलबिले सुनिल तानाजी | खुला | सेवाज्येष्ठतेने (खुला) | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी |

**विषय क्र.३४**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/६३, दि.१८/०४/२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४, दि.५/५/२०२२

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचेनाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसारक्षेत्र | टीडीआर देय क्षे. चौ.मी | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे,बालेवाडी, स.नं.२४/३(पै) | मंडई आणि शॉपिंग सेंटर (एम ॲन्ड एससी-१) | मे.एलिट बिल्डकॉर्प तर्फे भागीदार गजेंद्र सोपानराव पाटील, सुनिता गजेंद्र पाटील | विरळ वस्ती | ३००.०० चौ.मी | ३००.०० चौ.मी. X २.१०= ६३०. ०० चौ.मी. | ००५९३६ | मार्च २०२२ |

**विषय क्र.३५**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/६४, दि.१८/०४/२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१५, दि.५/५/२०२२

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआरझोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टीडीआर देय क्षे. चौ.मी | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धानोरी स.नं.१९/१ (पैकी) | १२ मी.डी.पी. रस्ता व अनबिल्डेबल | श्री.भिमराव धोंडिबा सरवदे | विरळ वस्ती | १५०.०० चौ.मी | १३८.९५चौ.मी. X २.१५= २९८.७४ चौ.मी. | ००५९३५ | मार्च २०२२ |

**विषय क्र.३६**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/६५, दि.१८/०४/२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१६, दि.५/५/२०२२

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचासर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचेनाव | टिडीआरझोन | टीडीआर देय क्षे. चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे,मंगळवारपेठ,सि.स.नं.३९१,३९२ बोलाई खाना | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.कामिल रियालिटी एल.एल.पी. | सुधारित नियमावली दि.१५(१)-५ नुसारझोननाहीत | ९६९४.६०चौ.मी.पैकी ४५००.०० ५१९४.६०(झोपडपट्टी पुनर्वसनइमारत ए योजने अंतर्गत इमारतीच्या जोतेपुर्णत्वापोटी २५% टिडीआर,आरसीसी व | ००४६३८ ००४६३९ | मार्च २०२२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वीटबांधकाम पुर्णत्वापोटी ३५% टिडीआरअसाएकूण ६०% टिडीआर | | |

**विषय क्र.३७**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/६७, दि.१८/०४/२०२२ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१७, दि.५/५/२०२२

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२२ मध्ये वरीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचेनाव | टिडीआरझोन | ७/१२ नुसारक्षेत्र | टीडीआर देय क्षे. चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे औंध-येथील स.नं.११८ ते १२४ (जुना) प्लॉट नं.२ स.नं. १८३ (नवीन) सि.स.नं.१२०३ | ६० फुटी डि.पी. रस्ता | जवाहरलाल के.वैद (लीज होल्डर, नॅशनल को-ऑफ हौसिंग सोसायटी लि.) | विरळ वस्ती | ७२७.१०चौ.मी | ६७.५०चौ.मी. X २.००= १३५.००चौ.मी. | ००५९२४ | मार्च २०२२ |

**नांव समितीचा ठराव**

**विषय क्र.३८**

**संदर्भः- मुख्य सभा ठराव क्र. ४, दि.२०/०४/२०१७**

**विषयः-** पुणे मनपाच्या हददीतील उद्याने, रस्ते, पुल, चौक इतर सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावाची शिफारस करणे.

नाव समितीची सभा गुरूवार दि.१०/०३/२०२२ रोजी दुपारी ३.३० (तीन वाजून तीस मिनिटे) विशेष समिती सभागृह, दुसरा मजला पुणे महानगरपालिकेची नविन विस्तारित इमारत येथे दृकश्राव्य (व्हिडीओ कॉन्फरन्सींग) द्वारे भरली होती. त्यामध्ये खालील विषय मान्य करण्यात आलेले असून त्यास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| वि.क्र. | सुचकाचे नाव | संक्षिप्त सिमा विस्तार | सुचविलेले नाव | मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ५२५ | मा.गणेश ढोरे<br>मा.अश्विनीताई पोकळे | प्रभाग क्र.४२अ,भेकराईनगर, गंगानगर, बनकर शाळेजवळील विरंगुळा केंद्रास | शहिद सौरभ फराटे विरंगुळा केंद्र | मान्य |
| ५३० | मा. श्री. युवराज बेलदरे<br>मा. श्री. वसंत मोरे<br>मा. श्रीमती अमृताताई बाबर<br>मा. सौ. स्मिताताई कोंढरे | प्रभाग क्र.४० मधील फ्लेनगर स.नं. ३४ येथील ओटा मार्केट इमारतीस | " स्व.श्री. संभाजी नाना बेलदरे (मा. सरपंच) बहुउददेशीय भवन" | मान्य |
| ५३१ | मा. श्रीमती रंजना टिळेकर<br>मा. सौ. वृषाली कामठे<br>मा. श्री. विरसेन जगताप | प्रभाग क्र. ४१मध्ये कोंढवा बु.स.नं. २९/२४/२५/१८ येथील ॲमेनिटी स्पेस वरती विकसित करण्यात आलेल्या प्लेस मेकींग या परिसरास | " कै. राजेंद्र मारूती मरळ" | मान्य |
| ५३२ | मा. श्रीमती रंजना टिळेकर<br>मा. सौ. वृषाली कामठे<br>मा. श्री. विरसिंग जगताप | प्रभाग क्र. ४१ मध्ये कोंढवा बु. स.नं. २४ व २५ या परिसरास | " ह. भ.प. कै. बेबीताई रघुनाथ मरळ" | मान्य |
| ५३३ | मा. श्री. प्रकाश ढोरे<br>मा.सौ.अर्चना मुसळे | प्रभाग क्र. ८ ड बोपोडीमधील नवीन ई- लर्निंग शाळेस | " स्व. सुमनताई ज्ञानोबा ढोरे ई- लर्निंग स्कुल" | मान्य |
| ५३४ | मा. सौ. राजश्री नवले<br>मा. श्री. हरिदास चरवड<br>मा. श्री. राजाभाऊ लायगुडे | प्रभाग क्र.३३ मधील प्रयेजा सिटी ते नांदेड सिटी येथील स.नं. ७१ वडगांव बुद्रुक ते | " कै. उमाकांत पांडुरंग कुंभारकर पाटील मार्ग" | मान्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | स.नं. ३९ वडगाव खुर्द येथील डी.पी. रस्त्यास | | |
| ५३५ | मा. श्री. धनराज घोगरे<br>मा. सौ. कालिंदा पुंडे<br>मा. रघुनाथ गौडा | प्रभाग क्र. २५ श्रीमंत महादजी शिंदे मनपा प्राथमिक शाळा क्र. ६२ बी येथे नव्याने तयार होणाऱ्या बास्केट बॉल कोर्ट व पॅवेलियनला | "श्रीमंत महादजी शिंदे बास्केटबॉल कोर्ट व पॅवेलियन" | मान्य |
| ५३६ | मा. सौ. अश्विनी पोकळे<br>मा. श्री. गणेश ढोरे | प्रभाग क्र. ४२ ब धायरी स.नं. ११/४/५ राज ब्लीस व युवानील सोसा.कडे जाणाऱ्या रस्त्यास | " कै. यमुनाताई पोकळे नगर" | मान्य |
| ५३७ | मा. सौ. अश्विनी पोकळे<br>मा. श्री. गणेश ढोरे | प्रभाग क्र. ४२ ब धायरी रायकर मळयाकडे जाणाऱ्या पुलास | " शिवभक्त श्री जैतुजीबाबा रायकर" | मान्य |
| ५३८ | मा.सौ.नंदा लोणकर<br>मा.श्री.संजय घुले<br>मा.श्री.प्रमोद भानगिरे | प्रभाग क्र.२६ क मधील ज्योती हॉटेल चौक ते एन.आय.बी.एम.चौक पर्यंतच्या रस्त्यास | पेरिनशेरी माझदा रस्ता | नांव देणे अडचणीचेआहे अशा अशयाचा मा. मुख्य अभियंता वाहतुक नियोजन विभाग यांचा अभिप्राय मान्य |
| ५३९ | मा.सौ.हेमलता मगर<br>मा.चेतन तुपे पाटील<br>मा.सुनिल उर्फ बंडुतात्या गायकवाड | प्रभाग.क्र.२२ ब मगरपट्टा येथील मगरपट्टासिटी पोलिस चौकी समोरील मगरपट्टासिटी कडे जाणाऱ्या रस्त्यास | कै.निवृत्ती शंकर मगर पथ | मान्य |

( टीप – सदर विषयाचा विचार माहे मे २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१९, दि.११/४/२०२२ चा झाला आहे. )

## मा.सभासदांचा प्रस्ताव

**विषय क्र.३९**

संदर्भ :- मा. धनराज घोगरे व मा.राजेश येनपुरे यांची सूचना दि.२८/२/२०२०

१) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र
२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.
३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.
४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२)१३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७
५) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ–नअ–वियो–२४८,दि.२५.५.२०००ने पाठविलेला अभिप्राय
६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००

----

१) वानवडी स.नं.६२, हि.नं.७,८ मधून २० फुटांचा रस्ता आखण्याचा ठराव आहे. जागेवर हिश्श्यांचे मध्य भागातील ३० फुट रस्त्याचे पूर्वेस श्री.बिलाल मिस्त्री यांची जागा आहे. मिस्त्री यांचे जागेत पूर्वेकडे गुंठेवारी पध्दतीची बांधकामे झालेली आहे. तेथील रहिवासियांनी वर नमूद केल्याप्रमाणे १० ते १२ फुटाची जागा सामाईक रस्त्यासाठी मोकळी जोडलेली आहे. या रिहवासियांना रस्ता मिळणे आवश्यक आहे. मूळ ठरावात नमूद केल्याप्रमाणे हिश्याचे मध्यभागातून रस्ता आखावयाचा झाल्यास श्री.मिस्त्री यांनी प्रथमच पासूनच अशा रस्त्याच्या आखणीस विरोध केल्यास्तव मिस्त्री यांनी सुचविल्याप्रमाणे त्यांचे जागेच्या दक्षिणेकडील १० फुट जागा रस्त्यासाठी त्यांनी मोकळी सोडली आहे. त्यांचे जागेतून दक्षिण उत्तर असा ( चॅम्पर) हा आखावा लागणार आहे. श्री.मिस्त्री यांचे पूर्वेकडील जागेतील गुंठेवारी पध्दतीची बांधकामातील सुटलेल्या जागेचाही सामाईक रस्त्याची रूंदी ही.डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार मिळत नसल्याने त्या भागात रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही. यास्तव सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे अ, ब.ब–१ आद्याक्षराप्रमाणे दर्शविल्यानुसार २० फुट रूंदीचा रस्ता आखणे योग्य होईल.

२) वानवडी स.नं.६२,हि.नं.६ मध्येही गुंठेवारी पध्दतीची बांधकाम असून तेथेही सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागाही १० ते १२ फुट इतकीच आहे. डी.सी.रूल क्र.नियम क्र.१२ नुसार सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागा ही रूंदीपात्र ठरत नसल्याने याही हिश्यात पुरेशी रूंदी अभावी रस्त्याची आखणी करणे संयुक्त होणार नाही.
३) वानवडी स.नं.६२, हि.नं.१ ते १२ मध्येही दक्षिण-उत्तर अशीच गुंठेवारी पध्दतीची बांधकामे असून तिथेही १० ते १२ फुट सामाईक रस्त्यासाठी जागा सुटलेली आहे. डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार रस्त्याच्या रूंदी मिळत नसल्याने रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही.

तरी वानवडी स.नं.६२, हि.नं.७-८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ-ब-ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखणेस मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.२२०, दिनांक२४/८/२००० चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :- १) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र
२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.
३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.
४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२) १३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७
५) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ-नअ-वियो-२४८,दि.२५.५.२०००ने पाठविलेला अभिप्राय
६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००
७) मनपा ठराव क्र.२०७ दि.२१/१२/२०२०
८) मनपा ठराव क्र.१८७,दि. २१/९/२०२१

----

वानवडी स.नं.६२, हि.नं.७-८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ-ब-ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखावा असे दर्शविलेले आहे. परंतु 'अ' आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता हा रद्द करण्यात यावा.कारण सदर ठिकाणी पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. त्यामुळे मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात 'ब-ब१' या आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता २० फुट रूंदीचा आखण्यात यावा.

**(टिप - सदर विषयाचा विचार माहे मे २०२२ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२०, दि. ११/४/२०२२ चा झाला आहे.)**

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**